ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)



# महिला नव उद्योजिकांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी केंद्र शासनाच्या उद्योगविषयक विविध योजना

डॉ. फिरोज फारूक शेख

कु.जयश्री प्रल्हाद शिंदे

**सारांश :**

अलिकडच्या काळात महिला सक्षमीकरणाचे वारे वेगाने वाहत आहे. महिला आपल्या चाकोरीतून बाहेर पडू स्वत:ला सिध्द करून यशाचे शिखर गाठताना दिसत आहेत. प्रत्येक आव्हांनावर मात करण्यासाठी स्वत:ला सक्ष करण्याकडे त्यांचा कल दिसून येत आहे. यासर्व प्रवासात किंवा आर्थिक सक्षम होण्यात त्यांना त्यांच्या कुटुंबातून पाठिंबा मिळतो आहे. हे चित्र फार आश्वासक व सकारात्मक आहे. या अनूषंगाने अजून सांगायचे झाल्यास महिलांच्य या वाटचालीत महिलांना सशक्त व सक्षम करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने अनेक पावले उचलली आहेत. विवि प्रकारच्या शासकीय योजना त्याचाच एक महत्वाचा भाग आहेत.

**प्रस्तावना :**

भारतात अर्धी लोकसंख्या स्त्रियांची आहे. या संख्येचे सशक्तीकरण व सक्षमीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे स्त्रियांचे महत्त्व त्यांनी जगाला सिद्ध करुन दाखविले आहे आणि जगाला देखील त्यांचे महत्त्व कळले आहे.

आजच्या या आधुनिक काळात महिला सबलीकरण फार महत्त्वाचा व चर्चेचा विषय ठरला आहे. त्यासाठी राज व केंद्र शासनाने शासकीय पातळीवर महिला वर्गाचा विकास करण्यासाठी विविध उपक्रम, कार्यक्रम, धोरणे, निर्णय कायदे व योजना देखील आणले आहेत.

भारतात महिला व बालविकास विभाग व मंत्रालयामार्फत महिलांच्या सशक्तीकरणासाठी विशेष लक्ष दिले जा आहे. त्यांच्यासाठी विविध प्रकारच्या उत्कृष्ट योजना राज्य व केंद्र शासनामार्फत राबविल्या जात आहेत.

भारत हा देश जगाच्या पाठीवर जलद गतीने प्रगती करताना दिसत आहे.सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय,आर्थि व शैक्षणिक क्षेत्रात जागतिक स्तरावर भारताचा मान मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे चित्र आहे. या सर्वांमध्ये स्त्रियांच भूमिका अंत्यत महत्त्वाची व मोलाची आहे. प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांच्या बरोबरीने किंबहूना त्यांच्यापेक्षा सरसप काम करताना दिसत आहेत.

महिलांचा विकास किंवा त्यांना आर्थिक सक्षम करण्यासाठी योग्य दिशेने पाऊले उचलणे गरजेचे आहे म्हणू त्या अनूषंगाने राज्य व केंद्र शासनाने देखील या बाबीकडे विशेष लक्ष केंद्रित करून किंवा या विषयांचे महत्त्व समजू घेऊन महिलांसाठी विविध प्रकारच्या योजना लागू करुन त्यांच्या विकासाला व आर्थिक सक्षम होण्यास सहाय्य पाठबळ दिले आहे.

**१) मुद्रा योजना :**

ब्युटी पार्लर, टयूशन सेंटर, टेलरिंग युनिट इत्यादी सारख्या लहान उद्योगाची सुरुवात करणाऱ्या महिलांसा ही सामान्य शासकीय योजना लागू आहे. ज्या महिला एकत्रितपणे प्रारंभ करू इच्छितात त्यांच्यासाठी देखील ही योज उपयुक्त आहे.

या योजनेअंतर्गत ५०,००० रुपयांपासून ते ५०लाख रुपयांपर्यत कर्ज मंजूर केले जाऊ शकते. यात कर्जा रक्कम १० लाखांपेक्षा जास्त असेल तरच तारण आणि गॅरंटरची आवश्यकता असते.

**या योजनेअंतर्गत तीन योजना आहेत.**

१) **शिशू योजना** : नवीन व्यवसायांसाठी ५०,००० पर्यंत कर्ज.

२) **किशोर योजना** : ५०,००० ते ५ लाखांमधील चांगल्या संस्थांसाठी कर्ज.

३) **तरुण योजना** : ५ लाख ते १० लाख रुपयांदरम्यान कर्ज व्यवसाय विस्तारासाठी.

**२) ट्रेड (व्यापार संबंधित उद्योजकता सहाय्य आणि विकास) योजना :**

या योजनेचा उद्देश्य स्त्रियांनी चालवलेल्या प्रकल्पांना प्रोत्साहन देणे, विशिष्ट स्पष्टीकरण व सल्ला देणे आणि त्यासंबंधित गरजा पूर्ण करणे असा आहे. त्यासाठी महिलांना योग्य मी माहिती पुरविली जाते.

यासाठी महिलांना कर्ज देणाऱ्या संस्थांना त्यांनी कोट केलेल्या (मूल्यांकित केलेल्या) एकूण प्रकल्प खर्चाच्या ३० टक्के पर्यंत रक्कम केंद्र शासनाकडून अनुदान म्हणून दिली जाते. इतर ७० टक्के वित्तपुरवठा संस्थेकडून केला जातो.

**३) महिला उद्योग निधी योजना :**

स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बँक ऑफ इंडिया (एसआयडीबीआय) द्वारा देऊ केली गेलेली ही योजना नवीन लघु उद्योग स्थापन करण्यासाठी १० लाख आर्थिक सहाय्य प्रदान करते.

या योजनेअंतर्गत विद्यमान प्रकल्पांचे उन्नतीकरण आणि आधुनिकीकरण करण्यासाठी देखील मदत केली जाते. कर्जाची परतफेड १० वर्षात करावी लागते आणि यात पाच वर्षाचा अधिस्थगन कालावधी देखील असतो.

यशिवाय या कर्जावरील व्याज दर बाजाराच्या दरानूसार बदलू शकतात.

**४) अन्नपूर्णा योजना :**

ही योजना स्टेट बँक म्हैसूर कडून पुरविण्यात आलेली आहे. ज्या महिलांचा पॅक केलेले जेवण, स्नॅक्स इत्यादी विकणे अशा प्रकारचा उद्योग आहे त्यांना या योजनेअंतर्गत व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी काही रक्कम कर्ज म्हणून मंजूर केली जाते.

त्यात जागा, स्वंयपाक घरात वापरल्या जाणाऱ्या वस्तू, साधने व उपकरणे यांची खरेदी यासारख्या गोष्टींचा समावेश आहे. या कर्जासाठी तारण सुरक्षा म्हणून संबंधित मालमत्तेच्या मालकीसह गॅरटर आवश्यक आहे.

याशिवाय दिली जाणारी जास्तीत जास्त रक्कम ३६ महिन्यांत सुलभ मासिक हप्त्यामध्ये भरणे आवश्यक आहे, तथापि कर्ज मंजूर झाल्यानंतर, कर्जावर पहिल्या महिन्यासाठी ईएमआय भरावा लागणार नाही.

**५) महिला उद्योजिकांसाठी स्त्री शक्ती पॅकेज :**

सदरील योजनेचा लाभ लहान व्यवसायात बहुसंख्य मालकी (५०टक्यांहून अधिक) असलेल्या स्त्रियांना दिली जाते. महिलांना त्यांच्या संबंधित राज्य एजन्सीद्वारे आयोजित उद्योजकता विकास कार्यक्रम (ईडीपी) मध्ये नामांकन करण्याची गरज असते.

या योजनेअंतर्गत २ लाखांपेक्षा जास्त कर्जावरील ०.०५ टक्के व्याजात सवलत मिळू शकते.

**६) भारतीय महिला व्यवसाय बँक कर्ज योजना :**

या योजनेत उत्पादन उपक्रमांच्या महिला व्यावसायिक मालकांसाठी २० कोटी रुपयांच्या कर्जाचा समावेश आहे.

सूक्ष्म आणि लघू उद्योगांसाठी क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्ट अंतर्गत, १ कोटी रुपयांपर्यंत कर्जासाठी तारण करण्याची गरज नाही. या बँकेच्या कर्जाच्या योजनेअंर्तगत कर्जाची परतफेड ७ वर्षात करावी लागेल.

या योजनेची अंमलबजावणी भारतीय महिला बँकेने केली होती. ही बँक नंतर सन २०१७ मध्ये स्टेट बँक ऑफ इंडियात विलीन झाली आहे.

**७) देना शक्ती योजना :**

शेती, उत्पादन, सूक्ष्म पत, किरकोळ मालाची दूकाने किंवा तत्सम लघू उद्योगांत महिला उद्योजिकांसाठी ही योजना रुपये ५० हजार ते २० लाख रुपयांपर्यंत कर्ज उपलब्ध करून देते.

या योजनेत व्याज दरात ०.२५ टक्के सवलत दिली गेलेली आहे.

**८) उद्योगिनी योजना :**

१८ ते ४५ वयोगटातील महिला उद्योजिका, शेती, किरकोळ आणि अशा प्रकारच्या लघू उद्योगात गुंतलेल्या आहेत. त्यांच्यासाठी योजनेअंर्तगत १ लाख रुपयांपर्यंत कर्जाची सोय केली गेलेली आहे.

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)



या कर्जाचा लाभ घेण्यासाठी संबंधित महिलेच्या कुंटुबाचे वार्षिक उत्पन्न ४५,००० रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तसेच विधवा, निराधार किंवा अक्षम महिलांसाठी कोणतीही उत्पन्न मर्यादा ठरविण्यात आलेली नाही अनुसूचित जाती व जमातीतील विधवा, निराधार किंवा अपंग महिलांसाठी, कर्जाच्या ३० टक्के अनुदान दिले जाते जे १०,००० रुपयांपर्यंत असू शकते.

**९) सेंट कल्याणी योजना :**

सेंट्रल बँक ऑफ इंडियाने उपलब्ध करून दिलेली ही योजना महिला व्यवसाय मालकांसाठी शेती कार्य किंव किरकोळ व्यापार यासारख्या कामासाठी तयार करण्यात आलेली आहे.

या योजनेअंर्तगत १ कोटी रुपयांपर्यंत कर्ज मंजुर केले जाऊ शकते. त्यासाठी कुठल्याही प्रकारचे तारण किंवा गॅरंटरचं आवश्यकता नाही. या कर्जावरील व्याज दर बाजारातील भिन्न दरांवर अवलंबून असतात.

**१०) समर्थ योजना :**

केंद्र शासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या या योजनेअंर्तगत महिलांना भिन्न-भिन्न प्रकारचे वस्त्र निर्मिती व त्याबाबतचे कार्य याबाबत शिकविल्या जाते. यात ७५ टक्के महिला काम करीत आहेत.

या योजनेचा मुख्य उद्देश महिलांना वस्त्रोद्योगात पुढे आणणे हा आहे कारण भविष्यात वस्त्रोद्योगात वस्त्र निर्मितीकरीता कामगारांची खुप मोठ्या प्रमाणात गरज भासणार आहे त्यामुळे या योजनेचा मुख्य उद्देश वस्त्रोद्योगात महिला कामगार व उद्योजिका तयार करणे हा आहे.

**११) मोफत शिलाई मशिन योजना :**

ज्या महिलांना शिलाई काम यात आवड व रूची आहे त्याच्यासाठी केंद्र शासनाद्वारे मोफत शिलाई मशिन योजना राबविल्या जाते. या योजनेचा लाभ देशातील ग्रामीण व शहरी भागातील आर्थिकदृष्ट्या कमजोर महिला घेऊ शकतात केंद्र शासनाद्वारे प्रत्येक राज्यात ५०,००० पेक्षा अधिक महिलांना नि:शूल्क शिलाई मशीन प्रदान केल्या गेल्या आहेत या योजनेअंतर्गत केवळ २० ते ४० वर्षाच्या महिला याचा लाभ घेऊ शकतात.

अशा प्रकारे या योजना केंद्र शासनाच्या काही महत्त्वांकाक्षी योजना आहे. ज्या विशेषकरून महिलासांठी तयार करण्यात आलेल्या आहेत आणि या योजना महिला सक्षमीकरणात मोलाचा वाटा उचलत आहेत.

**संदर्भग्रंथ सूची :**

१) मगर. ज्ञ.ब., (२०१३), सरकारी योजना (तृतीय आवृत्ती), सोलापूर : रत्नाई प्रकाशन
२) मगर. ज्ञ.ब., (२०१९), भारतीय अर्थव्यवस्था भाग-९ (प्रथम आवृत्ती), सोलापूर : रत्नाई प्रकाशन
३) कोळंबे. र.र., (२०२१), भारतीय अर्थव्यवस्था (चौदावी आवृत्ती), पूणे : भगीरथ प्रकाशन
४) शिदें.म.रा., (२०२१),शासकीय योजना (द्वितीय आवृत्ती), पूणे : ज्ञानदिप प्रकाशन
5) womanchild.maharashtra.gov.in
6) wcd.nic.in

**कु.जयश्री प्रल्हाद शिंदे**

पीएच.डी संशोधिका, शिक्षणशास्त्र विभाग, झाकीर हुसैन कॉलेज ऑफ एज्यूकेशन, खुलताबाद. ता. खुलताबाद जि. औरंगाबाद (महा.)(महा.)

**डॉ. फिरोज फारूक शेख**

प्राचार्य, झाकिर हुसेन कॉलेज ऑफ एज्यूकेशन, खुलताबाद. ता.खुलताबाद जि. औरंगाबाद (महा.)